तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. शा: ३१८०५
दिनांक २६.११.२१
कार्यासन क्र. ...

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४४१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र.२२०४०९३५ Email ID : manali.samant@nic.in

---

क्रमांक: तंबानि-१२२१/प्र.क्र.१२८/२१/तांशि-३ दिनांक: २४ नोव्हेंबर, २०२१.

प्रति,
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

आवक विभाग
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-१

विषय : शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये मुलींसाठी वसतीगृह बांधकाम करणे-४२०२ ५९९२ या केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत निधी वितरीत करणेबाबत...

संदर्भ:-१) आपले पत्र क्र.९/नियोजन/वितरीत/२०२१/२८६, दि.६ जुलै, २०२१.
२) समक्रमांकाचे दि.८ जुलै, २०२१ चे पत्र.
३) आपले पत्र क्र.९(१)/तंशिसं/नियोजन/२०२१/३७९, दि.३० सप्टेंबर, २०२१.

आपण संदर्भाधीन दि.६ जुलै, २०२१ व दि.३० सप्टेंबर, २०२१ च्या पत्रान्वयें शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये मुलींसाठी वसतीगृह बांधकाम करणे-४२०२ ५९९२ या केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

शासकीय तंत्रनिकेनांतील मुलींसाठी वसतीगृह बांधणे-४२०२ ५९९२ या केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत यापूर्वी प्रशासकीय मान्यता दिलेली काही कामे पूर्ण होऊन हस्तांतरीत झालेली असुन त्यांची अंतिम देयके प्रलंबित आहेत. तर काही कामे अंतिम टप्प्यात असुन त्यांना राज्य हिश्याचा संपूर्ण निधी वितरीत करण्यात आला असुन केंद्र हिश्याचा निधी अप्राप्त असल्यामुळे निधी अभावी पूर्ण झालेली नाहीत.

सदर योजनेंतर्गत पूर्णत्वास आलेली कामे विहित वेळेत पूर्ण झाली नाहीत तर सदर कामांच्या अंदाजपत्रकाच्या किंमतीत वाढ होणाची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर कामांसाठी केंद्र शासनाकडून मंजूर झालेला केंद्र हिश्याचा निधी प्राप्त होईपर्यंत पूर्णत्वास आलेली कामे पूर्ण करण्यासाठी तसेच काही पूर्ण झालेल्या कामांची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी, केंद्र हिश्याचा निधी प्राप्त झाल्यावर हा निधी राज्य शासनास जमा करण्याच्या अटीच्या अधीन राहून तूर्तास राज्य हिश्याच्या निधीतून सदर कामांना निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तथापि, केंद्र हिश्याचा निधी थेट संबंधित संस्थेस प्राप्त होत असल्यामुळे, याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेचे प्रायार्च यांची राहील.

तसेच सदर योजनेंतर्गत ज्या संस्थांना केंद्र शासनाकडून मुलींच्या वसतीगृह बांधकामासाठी पहिला हप्ता प्राप्त झाला असुन दुसरा हप्त्याचा निधी अद्याप अप्राप्त आहे, अशा संस्थांचा

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
आवक क्र. ९०८९३ .... 2021

Urgent

बांधकामाच्या भौतिक प्रगती अहवाल व प्राप्त निधीचे खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर करण्यात यावे व उर्वरित निधी प्राप्त करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा.

(प्रणाली सावंत)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर. (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
२. संबंधित संस्था (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
३. निवडनस्ती/तांशि-३.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे


दूरध्वनी क्र.०२०-२५५५६२३४/२५५५७२७६
Email ID : robune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.


जा. क्र. : तंशिविकापु/विवि-३/२०२१/ ५८२८
दिनांक : २१/१२/२०२१ 27 DEC 2021

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय पदविका व पदवी,
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग पुणे)

शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये मुलींसाठी वसतीगृह बांधकाम करणे- ४२०२ ५११२ या केंद्र व राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत निधी वितरीत करणे बाबतचे पत्र प्राप्त झालेले आहे.

पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित करणेत येत आहे.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे